**<u>ठळक बातम्या</u>**

- नागपूर दंगलीत नुकसान झालेल्यांना येत्या ३-४ दिवसात नुकसान भरपाई मिळणार, दंगेखोरांकडून नुकसान भरपाईची रक्कम वसूल करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश
- MBA, CET मध्ये घोटाळा करण्याच्या प्रयत्नात असलेल्या चौघांना मुंबई पोलिसांकडून अटक
- यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांना जाहीर

**आणि**

- आयपीएल आजपासून सुरू होणार, पहिला सामना थोड्याच वेळात कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात

**<><><><><>**

नागपूरमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या दंगलीत सर्वसामान्यांच्या मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई येत्या ३-४ दिवसात देण्याच्या सूचना दिल्या आहेत. दंगलीमध्ये ७१ वाहनांचे तसेच विविध मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानीची सर्व रक्कम दंगेखोरांकडून वसूल केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. नागपूर शहरातल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते.

**होल्ड - मुख्यमंत्री -१**

नागपूर शहराच्या अकरा पोलीस स्टेशनच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू केले आहे. लवकरच यात शिथिलता आणू असं आश्वासन त्यांनी दिलं. दंगल प्रकरणी १३ गुन्हे दाखल झाले असून १०४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी १२ विधी संघर्षग्रस्त बालक आहेत. दंगल भडकवण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या विविध समाज माध्यमांवरच्या २५० पोस्ट टाकणाऱ्या ६२ लोकांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून दोघांना अटक केल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड - मुख्यमंत्री- २**

आगामी सण आणि उत्सवाच्या काळात शांतता भंग होणार नाही यादृष्टीने सहकार्य करण्याचं आवाहन त्यांनी जनतेला केलं. तसेच शांतता भंग करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी पोलिसांना दिले.

**<><><><>**

नागपूरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या एकाचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला. इरफान अन्सारी असं या ४० वर्षीय इसमाचं नाव आहे. १७ मार्च रोजी नागपूर इथं झालेल्या हिंसाचारात अन्सारी हे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते, मात्र आज त्यांचा मृत्यू झाला.

**<><><><>**

नागपूर जाळपोळ आणि हिंसाचार प्रकरणात आज काँग्रेसच्या समितीनं संचारबंदी लागू असलेल्या ठिकाणांना भेट देण्याचा प्रयत्न केला. पण

पोलिसांनी परवानगी नाकारली. त्यामुळं समितीनं पोलिस आयुक्तांची भेट घेऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली.

<><><><><>

राज्यात सध्या साखरेचं उत्पादन घटल्यानं साखर कारखान्यांपुढे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. त्यासंदर्भात केंद्रीय स्तरावर देशाचे सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत विशेष बैठक घेण्याकरता निवेदन देणार असल्याचं राष्ट्रीय सहकारी कारखाना संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी सांगितलं. ते आज पुण्यात बोलत होते. उत्तरप्रदेशमध्ये २३८ या ऊसाच्या वाणाला रोगराई लागलेली आहे. तसंच कर्नाटक, गुजरातसह राज्यातल्या ऊसाला पांढरे तुरे आल्यानं ऊसाच्या वजनासह उताराही कमी झाला आहे. त्यामुळे सुमारे सतरा टक्क्यांनी साखर उत्पादन घटलं असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

मुंबईतल्या रेल्वे प्रवाशांचे प्रश्न सोडवण्यासाठी कृतिआराखडा तयार करणार असल्याचं आश्वासन रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलं. कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे आणि ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी आज नवी दिल्लीत त्यांची भेट घेतली आणि मुंबई उपनगरी रेल्वे प्रवाशांच्या विविध मागण्यांबाबतचं निवेदन सादर केलं. उपनगरी रेल्वे प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, प्रवाशांना अधिक चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात, सेवांचा दर्जा सुधारावा, या आणि इतर मागण्यांचा यात समावेश आहे.

<><><><><>

एम बी ए सामायिक प्रवेश परीक्षेसाठी बनावट प्रवेश प्रक्रिया राबवण्यात सहभागी असल्याच्या आरोपाखाली दोन बी टेक विद्यार्थ्यांसह चार जणांना मुंबई गुन्हे अन्वेषण विभागानं अटक केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सामायिक प्रवेश परीक्षेची पूर्वतयारी करून घेणाऱ्या एका शैक्षणिक संस्थेच्या समन्वयकाने दाखल केलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. सामायिक प्रवेश परीक्षेला प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना मोठ्या रकमेच्या बदल्यात संगणकीय प्रणालीद्वारे परीक्षेत जास्त गुण प्राप्त करण्यासाठी मदत करण्याचे आमिष दाखवत भंडारा, गोंदिया, यवतमाळ आणि जालना इथली परीक्षा केंद्र स्विकारण्यासाठी तयार करण्याचे काम आरोपी करत असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण विभागानं दिली आहे.

**<><><><><>**

औरंगजेबाच्या कबरीला असलेला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा रद्द व्हावा अशी मागणी करणारी जनहित याचिका नाशिकचे सामाजिक कार्यकर्ते रतन लथ यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. केंद्र शासनाने १९५१ मध्ये या कबरीला राष्ट्रीय संरक्षित स्मारकाचा दर्जा दिला होता. केवळ हैदराबादमधल्या काही अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे हा दर्जा देण्यात आला. त्यासाठी लोकप्रतिनिधींची संमती घेण्यात आली नव्हती, असं रतन लथ यांनी याचिकेत म्हटलं आहे.

ही कबर राष्ट्रीय स्मारकांच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे ती हटवण्याचे आदेश भारतीय पुरातत्व विभागाला द्यावेत, अशी मागणी करणारी याचिका

माहिती अधिकार कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांना अर्थशास्त्रातल्या भरीव योगदानासाठी वर्ष २०२५साठीचा ‘पुण्यभूषण पुरस्कार’ जाहीर झाला आहे. पुष्यभूषण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. या पुरस्काराचं हे ३७वं वर्ष आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा लवकरच होणार असून यात देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावत असताना जखमी झालेल्या चार जवानांचा आणि एका वीरमातेचा गौरव मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी या आठवड्यात गेल्या ४ वर्षातली सर्वोत्तम तेजी नोंदवली. या कालावधीत सेन्सेक्स ३ हजारांहून अधिक तर निफ्टी साडे ९०० हून अधिक अंकांनी वधारला. टक्केवारीचा विचार करता ही सुमारे ४ टक्के वाढ आहे. निफ्टीनं फेब्रुवारी २०२१ नंतर पहिल्यांदा आणि सेन्सेक्सनं जुलै २०२२ नंतर पहिल्यांदा एकाच आठवड्यात एवढी मोठी तेजी नोंदवली आहे. डॉलरच्या तुलनेत बळकट होणारा रुपया, कमी दरात उपलब्ध असलेले समभाग, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांचं पुनरागमन यासारख्या कारणांमुळं बाजारात तेजी दिसून येते आहे, असं विश्लेषकांचं मत आहे.

**<><><><><>**

माती आणि पाणी मानवी जीवनासाठी अतिशय महत्वपूर्ण घटक आहेत, त्यामुळे माती आणि पाण्याचं संवर्धन करणं अत्यंत महत्वाचं असल्याचं मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी म्हटलं आहे. मृद आणि जलसंधारण विभागाच्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण आणि रुंदीकरण' या महत्त्वाकांक्षी योजनांसाठी तयार करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पोर्टलचं उद्घाटन आज जागतिक जल दिनानिमित्त राठोड यांच्याहस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

तुळजापूरला जाणाऱ्या भाविकांची भरधाव कार बीड-गेवराई रस्त्यावर रांजणी फाटा इथल्या पुलावरच्या कठड्याला धडकल्यानं आज पहाटे दोघांचा मृत्यू झाला तर अन्य सात ते आठ जण गंभीर जखमी झाले.

**<><><><><>**

क्रिकेट रसिकांचं लक्ष लागून असलेल्या आय पी एल अर्थात इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला आजपासून कोलकात्यात सुरुवात होत आहे. एकूण १० संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. आयपीएलचा हा १८ वा हंगाम असून १८ मे पर्यंत साखळी सामने रंगणार आहेत, तर २५ मे रोजी अंतिम सामना होणार आहे.

गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात आज संध्याकाळी साडे ७ सलामीचा सामना होणार आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समधे आजच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ४ सुवर्णांसह ४ रौप्य पदकं पटकावली.

महिला भालाफेकीत महाराष्ट्राच्या भाग्यश्री जाधवला सुवर्णपदक मिळालं. पुरुषांच्या १००मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रणव देसाई आणि महिलांच्या थाळीफेक प्रकारात अक्कुताई उलभागट यांनी सुवर्णपदक पटकावलं. ४०० मीटर धावण्याच्या प्रकारात नाशिकच्या दुर्गम भागातील दिलीप गावित यांनी आपलं सुवर्णपदकावर नाव कोरलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यातलं हवामान प्रामुख्यानं कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. उद्या सांगली, सोलापूर, संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव, चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची दाट शक्यता असून काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह मेघगर्जनेची शक्यता आहे.

**<><><><><>**

संत साहित्यातून सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला असून समाज एकसंघ ठेवण्याचं सामर्थ्य संत विचारांमध्ये आहे, असं प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे.

***//<><><><><>//***